POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१८८ ● मुंबई, सोमवार, ०९ फेब्रुवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## ईव्हीएम मशीनवरच जादूटोणा?

### तर कोल्हापूरात शिवसैनिकानं जागेवरच ईव्हीएम मशीन फोडलं




**सोलापूरात ईव्हीएम मशीनवरच जादूटोणा?**

तर दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुळेगाव तांडा येथे मतदान केंद्रावर नियमीत मतदान सुरू होते. त्यावेळी एक महिला मतदान केंद्रावर गेली. मतदान करून बाहेर येताच ती महिला चक्कर येऊन कोसळली. शुद्धीवर आल्यावर तिने ईव्हीएम मशीनच्या खाली लिंबू-मिरची आणि जादूटोणा केल्याचा दावा केला. त्याठिकाणी लिंब-मिरची आढळल्याने एकच गोंधळ उडाला. हा प्रकार कोणी केला यावरून कार्यकर्ते आक्रमक दिसले.

**बॅलेट पेपरवर निवडणुका घ्या, ईव्हीएमचं फोडलं**

तर कोल्हापूरात एका शिवसैनिकाने अगोदर मतदान केलं. मग बॅलेट पेपरवर निवडणूक का नाही असा प्रश्न करत ईव्हीएम मशीन फोडलं. भुदरगड तालुक्यातील नाधवडे मतदान केंद्रावर हा प्रकार घडला. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे ग्राहक सेनचे जिल्हाप्रमुख जयवंत वायदंडे यांनी ईव्हीएम मशीन जागेवरच आपटले. हे मशीन त्याचवेळी फुटले. बॅलेट पेपरवर निवडणुका घ्या अशी मागणी त्यांनी केली. या प्रकारामुळे मतदान केंद्रावर काही वेळ तणावाचे वातावरण होते.

■ **बातमी /लेख,**
**प्रीती दिपक नाईक**

राज्यात शनिवारी १२ जिल्हा परिषद निवडणुकीसाठी मतदान पार पडले. यावेळी अनेक धक्कादायक प्रकार घडले. जिल्हा परिषद निवडणुकीचे अनेक रंग समोर आले. काही ठिकाणी ईव्हीएम मशीनवरवच जादूटोणा करण्याचा प्रयत्न झाला. कोल्हापूरात मतदान केल्यावर शिवसैनिकाने जागेवरच ईव्हीएम मशीन फोडले. सोलापूरात तर ईव्हीएम मशीन थेट धाब्यावर पोहचले. यामुळे एकच खळबळ उडाली आहे. निवडणुकीतील विविध रंग यानिमित्ताने समोर आले आहेत.

**धाराशिव येथील स्ट्रॉंग रूम भोवती ३६ पोलीस कर्मचारी अधिकान्यांचा पहारा**

धाराशिव जिल्हा परिषद, आणि आठ पंचायत समितीसाठी काल मतदान प्रक्रिया पार पडली जिल्हा परिषदेच्या ५५ जागेसाठी २३४ उमेदवार तर पंचायत समितीच्या ११० जागेसाठी २९३ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले आहे त्या मतपेट्या धाराशिव शहरातील शासकीय आयटीआयमध्ये ठेवण्यात आले आहेत. त्या स्ट्रॉंग रूम समोर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. तेराशे आठ मतदान केंद्रांवर ही मतदान प्रक्रिया पार पडली अनेक दिग्गज नेत्यांच्या प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

## मोहोळमध्ये ईव्हीएम मशिन सापडल्या ढाब्यावर

### महाराष्ट्र निवडणूक आयोगाची मोठी कारवाई

**मोहोळमधील राखीव मतदान यंत्र प्रकरणी संबंधितांवर कठोर कारवाई**




मोहोळ तालुक्यात (जि. सोलापूर) जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीदरम्यान राखीव मतदान यंत्र सुरक्षा कक्षात वेळेत जमा न केल्याप्रकरणी संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल, असे राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे. सोलापूरचे जिल्हाधिकारी आणि मोहोळ येथील निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिलेल्या माहितीनुसार संबंधित मतदान यंत्र प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेसाठी वापरली गेलेली नाहीत. ती राखीव स्वरूपातील होती. त्यामुळे प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेत कोणतीही अनियमितता किंवा गैरप्रकार आढळून आलेला नाही. तरीसुद्धा ही मतदान यंत्र वेळेत सुरक्षा कक्षात जमा न केल्याप्रकरणी संबंधितांवर कडक कारवाई केली जाणार आहे.

मोहोळ तालुक्यातील २२० मतदान केंद्रांवर ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. मतदानानंतर काही राखीव मतदान यंत्र तात्काळ सुरक्षा कक्षात जमा न झाल्याने संभ्रम निर्माण झाला. कुरूल (५५) गटातील काही मतदान केंद्रांसाठी नियुक्त क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडील २ कंट्रोल युनिट आणि २ बॅलेट युनिट यासंदर्भात हा प्रकार घडला.

दरम्यान, ही मतदान यंत्रे एका वाहनातून खासगी ठिकाणी नेण्यात आल्याची माहिती समोर आल्यानंतर नागरिक व राजकीय प्रतिनिधींनी आक्षेप घेतला. घटनेची माहिती मिळताच निवडणूक प्रशासन व पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. सर्व उपस्थितांच्या साक्षीने पंचनामा करण्यात आला व ही मतदान यंत्रे राखीव स्वरूपातील असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर सदर मतदान यंत्रे शासनाच्या सुरक्षा कक्षात सीलबंद करण्यात आली आहेत.

■**सोलापूर। प्रतिनिधी,**

निवडणूक आली की सर्वात आधी डोळ्यासमोर येतं ते ईव्हीएम...मतदान केंद्रावरच आपल्याला ईव्हीएम बघायला मिळतात. एकदा का निवडणूक झाली की ते एश्ट निवडणूक आयोग आपल्या ताब्यात घेतं आणि स्ट्राँगरुममध्ये ठेवलं जातं. मात्र, हे ईव्हीएम तुम्हाला एखाद्या ढाब्यावर पहायला मिळालं तर? आम्ही असं विचारतोय कारण सोलापूरमधील एका ढाब्यावर एश्ट बघायला मिळालंय. महाराष्ट्र निवडणूक आयोगाने या प्रकरणात मोठी कारवाई केली आहे.सोलापूरमध्ये शनिवारी जिल्हा परिषद आणि पंचायत समितींसाठी मतदान पार पडलं. मतदाननंतर सर्व एश्ट स्ट्राँगरुमकडे रवाना झाले. मात्र रात्री ११ ते १२ च्या दरम्यान दोन एश्ट सोलापूरच्या मोहोळमधील एका ढाब्यावर सापडल्यानं खळबळ उडाली. राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार उमेश पाटील यांनी हा प्रकार उघडकीस आणला असून त्यांनी या संबंधित व्यक्तींना जाब विचारलाय. घटनेची माहिती मिळताच निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सीमा होळकर आणि पोलीस निरीक्षक हेमंत शेंडगे हे देखील घटनास्थळी दाखल झाले. उमेश पाटलांना सापडलेल्या दोन्ही मशीन राखीव असल्याचं स्पष्टीकरण उपजिल्हाधिकाऱ्यांनी दिलंय. मात्र उमेश पाटील यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केलीये. उमेश पाटलांच्या या मागणीवरून भाजपने त्यांच्यावर टीका केलीये. उमेश पाटलांनी स्टंटबाजी केल्याचा आरोप भाजपचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाणांनी केलाय. तर शिवसेना वडळच्या अंबादास दानवेंनी यावरून निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केलेत. प्रशासनाकडून ते एश्ट राखीव असल्याचं सांगण्यात आलंय. मात्र तरिही मतदान प्रक्रियेत सर्वाधिक महत्वाचं असलेलं एश्ट अशा प्रकार कुठेही ठेवलं जाणार असेल तर ते अत्यंत गंभीर अशी बाब आहे.

## मुंबईकरांनो लक्ष द्या! 'या' भागांवर परिणाम

### मंगळवारी १४ तास पाणीपुरवठा बंद

■**मुंबई। प्रतिनिधी,**

बृहन्मुंबई महानगरपालिकेने पाली हिल जलाशयाकडे जाणाऱ्या ९०० मिमी इनलेट पाइपलाइनमध्ये गळती झाल्याने तातडीने दुरुस्तीचे काम घेतले आहे. ही दुरुस्ती मंगळवार, १० फेब्रुवारीला सकाळी १० ते रात्री १२ वाजेपर्यंत केली जाणार आहे. या काळात खार आणि बांद्रा परिसरातील अनेक भागांत पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहील, तर काही भागांत कमी दाबाने पाणी येईल.



बांद्रा पश्चिम-कुरेशी नगर झोपडपट्टीजवळील खुल्या म्हाडा प्लॉटमधील जलवाहिनी आणि वेस्टर्न एक्सप्रेस हायवे लगतच्या काही भागात दुरुस्ती केली जाणार आहे.

**बीएमसीचे नागरिकांना आवाहन**

- दुरुस्तीपूर्वी पुरेसे पाणी साठवून ठेवा.
- कामाच्या काळात पाण्याचा वापर जपून करा.
- पुढील काही दिवस पाणी उकळून आणि गाळून प्या.

**कोणत्या भागांत पाणीपुरवठा पूर्ण बंद?**

- बांद्रा पश्चिम : हिल रोड, पेरी रोड, मॅन्युएल गोंसाल्व्हेस रोड, सेंट अँड्र्यूज रोड, सेंट पॉल रोड, कार्टर रोड, पाली व्हिलेज, चिंबई व्हिलेज, शर्ली व्हिलेज, कांतवाडी परिसर
- खार पश्चिम : खार दांडा, कोळीवाडा, दांडा पाडा, चुईम गाव, गझदार बांध झोपडपट्टी, खार पश्चिमेतील काही भाग
- बांद्रा-खार परिसरातील इतर भाग : हनुमान नगर झोपडपट्टी, लक्ष्मी नगर, कार्टर रोड, युनियन पार्क (रोड क्र. १ ते ४), पाली हिल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड परिसर, पाली पठार झोपडपट्टी, १५ ते २० नंबर रस्ते (खार),
- चॅपेल रोड, व्हेरोनिका रोड, डॉ. पीटर डायस रोड, सेंट जॉन द बॅप्टिस्ट रोड, माउंट मेरी कॅथेड्रल व परिसर, के. सी. रोड, एल. के. मेहता रोड, बाजार रोडचे काही भाग, ए. के. वैद्य रोड, झिगझॅग रोड, नरगिस दत्त रोड, पाली माला रोड
- कमी दाबाने पाणी येणारे भाग : हिल रोडच्या शेवटापासून ताज लँड्स एंडपर्यंतचा परिसर, बी. जे. रोड, एच. के. भाभा रोड, डॉ. काणे रोड, गणेश झोपडपट्टी परिसर या भागांना मध्यरात्रीनंतर पहाटे १ ते ४.३० वाजेपर्यंतच पाणीपुरवठा मिळेल.

## बोगस आदिवासी विद्यार्थी शोधण्याची मोहीम

### २०२४-२५ वर्षातील प्रवेश तपासणार

**आदिवासींना डिजिटल जातवैधता प्रमाणपत्र**

बोगस जातवैधता प्रमाणपत्रे मिळवण्याच्या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी आदिवासी विकास विभागाकडून गेल्या २ महिन्यांपासून डिजिटल जातवैधता प्रमाणपत्र दिली जात आहेत. त्यासाठी पुण्यातील आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेने (टीआरटीआय) ई ट्राइब व्हॅलिडिटी हे पोर्टल विकसित केले आहे. या पोर्टलच्या आधारे याआधी दिलेल्या वैधता प्रमाणपत्रांची छाननी केली जाणार असल्याची माहिती आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे यांनी दिली. त्यांनी असेही सांगितले की, बोगस कागदपत्रांच्या आधारे प्रवेश लाटला गेल्याने खऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांवर अन्याय झाला आहे. त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांवर कारवाई करण्याची मागणी विभागाने केली आहे.




■**मुंबई। प्रतिनिधी,**

बनावट जातवैधता प्रमाणपत्राच्या आधारे व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्याच्या वाढत्या प्रवृत्तीला चाप लावण्यासाठी आदिवासी विकास विभागाने चालू शैक्षणिक वषानंतर आता सन २०२४-२५ या वर्षात आदिवासी कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे तपासण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे बोगस जातवैधता प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेश मिळवलेल्या आणि यंदा अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य टांगणीला लागण्याची शक्यता आहे.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात वैद्यकीय, अभियांत्रिकी, औषधनिर्माण यासारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमाला अनुसूचित जमातीच्या (एसटी) कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी जवळपास ३२ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी बनावट जातवैधता प्रमाणपत्र सादर केल्याचे आदिवासी विभागाला छाननीत आढळून आले आहे. त्यामुळे विभागाने मागे जात २०२४-२५ या वर्षात आदिवासी कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रांची छाननी करण्याचा निर्णय घेतला आहे. या छाननीतून प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी बोगस जातवैधता प्रमाणपत्राचा आधार घेतला किंवा कसे हे स्पष्ट होणार असल्याचे आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे सांगितले.

व्यवसायिक अभ्यासक्रमांना राखीव प्रवगार्तून प्रवेश घेण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांना प्रवेशावेळी जातवैधता प्रमाणपत्र सादर करावे लागते. चालू शैक्षणिक वर्षात अनुसूचित जमातीच्या कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या जातवैधता प्रमाणपत्राची छाननी केली असता ३२ विद्यार्थ्यांनी सादर केलेले प्रमाणपत्र विभागाकडून जारी करण्यात आले नसल्याचे आढळून आले. तसेच काही विद्यार्थ्यांनी केवळ जातवैधता प्रमाणपत्र मिळवण्यासाठी केलेल्या अर्जाच्या पावतीच्या आधारे प्रवेश घेतल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे विभागाने अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्याची मागणी करणारे पत्र व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षा घेर्णाया सीईटी कक्षाच्या आयुक्तांना लिहिल्याची माहिती वाघमारे यांनी दिली. तसेच प्रमाणपत्र, कागदपत्रांची योग्य पडताळणी न करता अशा विद्यार्थ्यांना प्रवेश कसे मिळाले? याची चौकशी करून संबंधित अधिकारी आणि शैक्षणिक संस्थांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी. तसेच याबाबत उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाला माहिती देण्याची सूचना सीईटी कक्षाच्या आयुक्तांना केल्याचे वाघमारे स्पष्ट केले.

## १३ कोटी ८० लाखांचे ड्रग्ज मुंबईला गुजरातशी जोडणाऱ्या रस्त्यावर सापडले

**इतरही अनेक ठिकाणी छापेमारी**

या कारवाईशिवाय फेब्रुवारी २०२६ च्या सुरुवातीला ठाणे शहर पोलिसांच्या अँटी-नार्कोटिक्स सेल (एएनसी) आणि क्राइम ब्रँचने विविध भागांत छापे टाकून मोठ्या प्रमाणात हेरॉइन, मेफ्रेड्रोन (एमडी), गांजा आणि अवैध कफ सिरप जप्त केले. हे ऑपरेशन्स अंतरराज्यीय ड्रग तस्करी नेटवर्कशी जोडलेले आहेत, आणि त्यात अनेक आरोपींना अटक करण्यात आली आहे. मुंब्रा पोलिसांच्या अँटी-नार्कोटिक्स सेलने दिवा पूर्व भागात छापा टाकून सहा लाख रुपये किंमतीचा २४.२ किलो गांजा जप्त केला आणि तीन आरोपींना अटक केली.हे आरोपी अंतरराज्यीय ड्रग तस्करी सिंडिकेटचा भाग असल्याचे सांगितले जात आहे. ठाणे शहर पोलिसांच्या एएनसीने दिवा येथील ह्युमॅनिटी पब्लिक स्कूलजवळ ट्रॅप रचून दोन आरोपींना अटक केली. या आरोपींकडे ७ कोटी रुपये किंमतीचं १.७३६ किलो हेरॉइन जप्त केलं. हे ड्रग एका कुप्रसिद्ध गँगस्टरशी जोडलेले असून तो २२ वर्षांपासून फरार होता.

■**वसई। प्रतिनिधी,**

ठाणे पोलिसांनी ड्रग्जचं एक मोठं रॅकेट उद्धवस्त केलं आहे. ड्रग्ज तस्करी करणाऱ्या तीन जणांना अटक करण्यात आली. या कारवाया खंडणी विरोधी पथक आणि अमलीपदार्थ विरोधी पथकाने केल्या आहेत. मागील काही काळात शहरांमध्ये ताब्यात घेण्यात आलेला हा सर्वात मोठा ड्रग्जचा साठा ठरला आहे.

**घोडबंदर रोडवरही कारवाई**

ठाणे पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींकडून १३ कोटी ८० लाखांचे हेरॉइन ड्रग्ज हस्तगत केल्याची माहिती गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलिस उपायुक्त अमरसिंह जाधव यांनी शुक्रवारी दिली. १ फेब्रुवारी रोजी गायमुख, मुंबईला गुजरातशी जोडणाऱ्या मुख्य मार्गांपैकी एक असलेल्या घोडबंदर रोड परिसरात सापळा रचून नालासोपाऱ्यात राहणाऱ्या 50 वर्षीय फरदीन गुलजार मुल्ला याला ताब्यात घेण्यात आलं. त्याच्याकडून सहा कोटी ८६ लाखांचे दोन किलो २८८ ग्रॅम वजनाचे हेरॉइन जप्त केले.

**सहा कोटी ९४ लाख ४० हजारांचे हेरॉइन**

दरम्यान, २३ जानेवारी रोजी पहाटेच्या सुमारास तलत सय्यद याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून सहा कोटी ९४ लाख ४० हजारांचे हेरॉइन हस्तगत केले. त्यानेच दिलेल्या माहितीच्या आधारे साथीदार मोहंमद खान महाडिक (६७, रा. कुर्ला) यालाही २६ जानेवारी रोजी अटक केली.




**टोळीचा पर्दाफाश**

वरिष्ठ पोलिस निरीक्षक जनार्दन सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली साहाय्यक पोलिस निरीक्षक नीलेश मोरे, सोमनाथ पाटील, उपनिरीक्षक राजेंद्र निकम, दीपक डुम्मलवाड, मोहन परब आणि हवालदार देसाई यांच्या पथकाने केलेल्या कारवाईमुळे आंतरराज्यीय अमली पदार्थ तस्करी करणाऱ्या टोळीचा पदार्फाश झाला.

## अल्पवयीन मुलीकडून घरातच बाळाचा जन्म

### स्वत: नाळ कापल्याचा धक्कादायक प्रकार उघड

■**पुणे। प्रतिनिधी,**

पुणे शहरात एका अत्यंत धक्कादायक आणि गंभीर घटनेने खळबळ उडवली आहे. अवघ्या १५ वर्षांच्या अल्पवयीन मुलीने घरामध्येच बाळाला जन्म दिला असून, प्रसूतीनंतर स्वतःच बाळाची नाळ कापल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. सध्या संबंधित मुलगी आणि नवजात बाळावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी मुलीच्या मोठ्या बहिणीने समर्थ पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून, त्यावरून पोलिसांनी आदिल फारुख शेख (वय २४, रा. गोल्ड सिटी बिल्डिंग, न्यू नाना पेठ) याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. ही घटना मार्च २०२५ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत घडल्याचे तपासात समोर आले आहे.

**फरशीवर व दरवाज्याजवळ रक्ताचे डाग**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिलेचा विवाह झालेला असून त्या ३२ जानेवारी रोजी सकाळी साडे अकराच्या सुमारास माहेरी आल्या होत्या. त्या वेळी घर आतून बंद असल्याचे त्यांच्या लक्षात आले. काही वेळाने भाऊ आल्यानंतर आवाज दिल्यावर लहान बहिणीने दरवाजा उघडला. घरात प्रवेश केल्यानंतर फरशीवर व दरवाज्याजवळ रक्ताचे डाग दिसून आले. तसेच खिडकीजवळ एक नवजात बाळ ठेवलेले आढळले.

**आदिल शेख याच्यासोबत प्रेमसंबंध**

कुटुंबीयांनी मुलीला विश्वासात घेऊन विचारणा केली असता तिने घरातच प्रसूती झाल्याचे सांगितले. बाळाची नाळ कोणी कापली, असा प्रश्न विचारल्यावर तिने स्वतःच नाळ कापल्याची कबुली दिली. त्यानंतर आई व आत्या घरी आल्यावर चौकशी केली असता, गेल्या वर्षभरापासून आदिल शेख याच्यासोबत प्रेमसंबंध असल्याचे आणि त्यातून अनेकदा शारीरिक संबंध झाल्याचे तिने सांगितले.

## डॉलरऐवजी कागदी बंडल देऊन चालकाला दोन लाखांना गंडवले... फसवणूक करणाऱ्या त्रिकुटास अटक

■**मुंबई। प्रतिनिधी,**

डॉलरऐवजी कागदी बंडल देऊन एका चालकाकडील दोन लाख रुपये घेऊन पळून गेलेल्या त्रिकुटाला सांताक्रुज पोलिसांनी अटक केली आहे. जमीदर आयुनल शेख, इनामुल नुहू शेख आणि साहिल मंगलू शेख अशी तीन आरोपींची नावे असून फसवणुकीच्या गुन्ह्यात सध्या तिघेही पोलीस कोठडीत आहेत. तिन्ही आरोपी सराईत गुन्हेगार असून त्यांच्या अटकेने अशाच इतर काही गुन्ह्यांची उकल होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. मात्र स्वस्तःत डॉलर खरेदीचा व्यवहार तक्रारदाराला चांगला महागात पडला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार विरार येथे राहत असून चालक म्हणून काम करतो. २२ जानेवारीला तो ठाण्यातील घोडबंदर रोड येथील फाऊंटन हॉटेलजवळ होता. त्यावेळी तिथे इनामुल नावाचा आरोपी आला आणि त्याने त्याच्याकडे ३२ हजार युएस डॉलर असल्याचे सांगितले. तसेच ते डॉलर भारतीय करन्सीमध्ये एक्सचेंज करायचे आहेच, मात्र माज्याकडे पासपोर्ट नाही. त्यामुळे डॉलर भारतीय करन्सीमध्ये एक्सचेंज करण्यासाठी तुम्ही मला मदत करा. मी तुम्हाला दोन टक्के कमिशन देतो, असे आमिष आरोपी इनामुलने चालकाला दाखवले.

इनामुलवर विश्वास ठेवून चालकाने त्याला करन्सी एक्सचेंज करण्यास मदत करण्याचे आश्वासन दिले. त्यानुसार तीन दिवसांनी म्हणजेच २५ जानेवारीला चालक विलेपार्ले रेल्वे स्थानकावर आला. तिथे इनामुलसोबत आणखी दोन जण होते. यावेळी इनामुलने चालकाला एक युएस डॉलर दिले. चालक तो डॉलर घेऊन भारतीय करन्सीमध्ये एक्सचेंज करण्यासाठी कार्यालयात गेला. त्यावेळी कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी डॉलर खरा असल्याचे सांगितले. त्यानंतर इनामुलने चालकाला दोन टक्के कमिशन देण्याऐवजी त्याच्याकडील ३२ हजार युएस डॉलर स्वस्तःत देतो असे सांगून चालकाकडून दोन लाख रुपये घेतले. ३२ हजार युएस डॉलर स्वस्तःत मिळाल्यामुळे चालक खूष झाला, मात्र थोड्या अंतरावर गेल्यानंतर चालकाने पिशवीतील डॉलर बघितले आणि त्याला धक्काच बसला. कारण इनामुलने चालकाला डॉलरऐवजी कागदी बंडल दिले होते.

आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच चालकाने त्याच्यासोबत घडलेला प्रकार सांताक्रुज पोलिसांना सांगून चारही आरोपींविरुद्ध तक्रार दाखल केली. फसवणुकीचा गुन्हा दाखल करून घेतल्यानंतर पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू केला. शोधमोहीम सुरू असतानाच जमीदर शेख, इनामुल शेख आणि साहिल शेख या तिघांना पोलिसांनी अटक केली. तसेच चौकशीत या तिन्ही आरोपींनी गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. त्यामुळे फसवणुकीच्या गुन्ह्यात ते तिघेही सध्या पोलीस कोठडीत असून पोलिसांकडून त्यांची चौकशी सुरू आहे. तसेच या तिघांनी अशाच प्रकारे इतर काही गुन्हे केल्याचे बोलले जाते. त्यामुळे त्यांच्या चौकशीत इतर काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# संपादकीय



संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## पुस्तके खाणारा 'प्रोजेक्ट पनामा'




अमेरिकेतील 'अँथ्रोपिक एआय' कंपनीच्या पनामा'मध्ये पुस्तकांच्या स्कॅनिंगसाठी वापरलेली विनाशकारी पद्धत वादात सापडली आहे. या प्रकारामुळे जगभरात एआय मॉडेलच्या प्रशिक्षणाबद्दल नैतिकतेचा मुद्दा उपस्थित झाला आहे. याशिवाय पुस्तकांच्या बौद्धिक संपदेबद्दलचे प्रश्नही नव्याने उपस्थित झाले आहेत. आहेत. यांत्रिक पद्धतीने पुस्तके स्कॅन करून, त्यांचे डिजिटायझेशन करून हा डेटा एआयला प्रशिक्षित करण्यासाठी वापरण्याचा हा प्रकार आहे. प्रकल्पाची सुरुवात अमेरिकेत २०२३मध्ये झाली. न्यायालयीन खटले सुरू झाल्याने सध्या हा प्रकल्प घेण्यासाठी 'प्रोजेक्ट पनामा' राबवणाच्या अँथ्रोपिक स्थगित आहे. हा नेमका प्रकार काय, ते जाणून एआय कंपनीबद्दल जाणून घेऊ. 'अँथ्रोपिक' कंपनीची स्थापना २०२१ मध्ये झाली. डारियो अमोडेई आणि डॅनिएला अमोडेई या बहीण-भावांनी ही कंपनी सुरू केली. हे दोघेही आधी 'ओपन एआय'मध्ये (चॅटजीपीटी बनवणारी कंपनी) वरिष्ठ पदांवर होते. एआयच्या सुरक्षिततेबद्दल मतभेद झाल्यामुळे त्यांनी 'ओपन एआय'मधून बाहेर पडून, स्वतःची कंपनी स्थापन केली. या कंपनीने २०२३मध्ये 'प्रोजेक्ट पनामा' हा प्रकल्प सुरू केला. एआय मॉडेलला प्रशिक्षित करण्याचा हा प्रकल्प आता वादात सापडला आहे. या प्रकरणाची धक्कादायक माहिती 'द वॉशिंग्टन पोस्ट'ने नुकतीच उघड केली आहे. अमेरिकेतील सॅन फ्रान्सिस्कोमध्ये मुख्यालय असलेल्या 'अँथ्रोपिक' कंपनीकडे 'क्लोड' नावाचे एआय मॉडेल आहे. या मॉडेलला प्रगल्भकरण्यासाठी कंपनीला उच्च दर्जाच्या डेटाची गरज होती. इंटरनेटवरील बरीचशी माहिती चुकीचीही असते. त्यामुळे दजेर्दार माहितीसाठी कंपनीने पुस्तकांचा आधार घ्यायचे ठरवले. जगातील सर्व उपलब्ध पुस्तकांमधील शुद्ध भाषा आणि ज्ञान एआयला शिकवायचे असा चंग कंपनीने बांधला. बौद्धिक संपदेचे वाद टाळण्यासाठी कंपनीने हे काम गुप्त ठेवले. त्यांनी वापरलेल्या अंतर्गत कागदपत्रांमध्ये या तंत्राला 'डिस्ट्रक्टिव्ह स्कॅनिंग' म्हटले आहे. टॉम टर्वे या प्रकल्पाचे मुख्य सूत्रधार, टर्वे सुरुवातीपासूनच या प्रकल्पाचे नेतृत्व करीत होते. 'अँथ्रोपिक' ने त्यांना या कामासाठी फेब्रुवारी २०२४मध्ये कामावर घेतले. टर्वे यांच्याकडे २० वर्षांचा 'गुगल' मधील अनुभव आहे. त्यांनी 'गुगल बुक्स' प्रकल्पावर काम केले आहे. पुस्तके मोठ्या प्रमाणात कशी मिळवायची आणि कायदेशीर अडचणी कशा हाताळायच्या, याचा अनुभव असल्याने कंपनीने टर्वे यांच्याकडे या कामाची जबाबदारी दिली. 'अँथ्रोपिक' ने यात लाखो जुनी आणि नवी पुस्तके विकत घेतली. यासाठी त्यांनी कोट्यवधी रुपये खर्च केले. 'प्रोजेक्ट पनामा'त वापरलेले स्कॅनिंग तंत्रज्ञान साध्या ऑफिस स्कॅनरपेक्षा पूर्णपणे वेगळे आणि अत्यंत वेगवान होते. याला 'डिस्ट्रक्टिव्ह स्कॅनिंग' किंवा 'शीट-फेड स्कॅनिंग' म्हटले जाते. यामध्ये सुरुवातीला पुस्तकाची बांधणी कापली जाते. पारंपारिक स्कॅनिंगमध्ये पुस्तक उघडून प्रत्येक पान काचेवर ठ-ेवावे लागते, ज्यात खूप वेळ जातो. याउलट, 'प्रोजेक्ट पनामा' मध्ये वेळ वाचवण्यासाठी सर्वांत आधी पुस्तकाची बांधणी एका मोठ्या 'गिलोटीन' कटरने कापली जाते. यामुळे पुस्तकाचे रूपांतर शेकडो सुट्या पानांच्या एका थप्पीत होते. ही पाने 'हाय-स्पीड ऑटोमॅटिक डॉक्युमेंट फीडर'मध्ये (एडीएफ) टाकली जातात. हे स्कॅनर इतके वेगवान असतात, की एका मिनिटात २०० ते ५०० पाने स्कैन करू शकतात. यात दोन्ही बाजूंचे स्कॅनिंग एकाच वेळी होते. अल्ट्रासोनिक सेन्सर्सचा वापर करून 'डबल फीड' (दोन पाने एकत्र जाणे) रोखले जाते. या प्रक्रियेत पानाचा केवळ फोटो काढून चालत नाही, तर त्यातील मजकूर एआयला वाचता येण्याजोगा असावा लागतो. यासाठी 'ऑप्टिकल कॅरेक्टर रिकग्निशन' (ओसीआर) तंत्रज्ञान वापरले जाते. पुस्तकातील क्लिष्ट फाँट आणि गणिताची सूत्रे ओळखणे डिजिटल प्रणालीला कठीण असते. ही सूत्रे आणि हस्तलिखिते अचूकपणे टिपण्यासाठी 'अँथ्रोपिक' ने विशेष अल्गोरिदमचा वापर केला. हाय-स्पीड स्कॅनरमध्ये पाने वेगाने फिरवून, स्कॅनिंग केले गेले. पुस्तकातील मजकूर डिजिटल स्वरूपात रूपांतरित झाला, की ती कापलेली पाने रिसायकलिंगसाठी पाठवण्यात येत असत. सन २०२४ आणि २०२५ या दोन वर्षांत या प्रकल्पाने वेग घेतला. याच काळात लाखो पुस्तके स्कॅन करून नष्ट करण्यात आली. पुस्तकांचे प्रत्यक्ष स्कॅनिंग करण्यासाठी अमेरिकेतील नेवाडा आणि ओहायोसारख्या राज्यांत मोठी गोदामे आणि स्कॅनिंग सेंटर उभारण्यात आली होती. 'अँथ्रोपिक' ने सहा महिन्यांत पाच लाख ते वीस लाख पुस्तके स्कॅन करण्याची क्षमता विकसित केल्याचे न्यायालयातील माहितीतून समोर आले आहे. यात कंपनीने पुस्तकांची खरेदी, वाहतूक, स्कॅनिंग अशा कामांवर मोठा खर्च केला. त्यात जगभरातील विविध भाषांमधील पुस्तकांचा समावेश होता. त्यातून मिळालेला 'डेटा' कंपनीने 'क्लोड ३.५' आणि त्यापुढील मॉडेलमध्ये वापरला आहे. या गुप्त प्रकल्पाची माहिती बाहेर येताच तंत्रज्ञान आणि साहित्य विश्वात खळबळ उडाली. ज्ञानाचा प्रसार करणाऱ्या पुस्तकांचाच असा 'बळी' दिला जात असल्यामुळे नैतिकतेचे नवे प्रश्न निर्माण झाले आहेत. कायदेशीर वाद आणि लेखकांच्या तीव्र विरोधामुळे कंपनीने नवीन पुस्तके स्कॅन करण्याचे काम सध्या थांबवले आहे. कंपनीने नुकताच अमेरिकेतील लेखकांच्या संघटनेशी समझोता केला असून, लेखकांना तडजोडीसाठी दीड अब्ज डॉलरची भरपाई देण्याचे मान्य केले. या सगळ्या प्रकरणातून अमेरिकेत आता एआयच्या प्रशिक्षणासाठी पुस्तकांचा वापर करण्याबद्दल नवे नियम लागू करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आ-हे. 'अँथ्रोपिक'चा प्रकल्प हा एकमेव नाही. 'मेटा' कंपनीनेही पुस्तकांचे मोठे डेटाबेस डाउनलोड केले आहेत. 'ओपन एआय' नेदेखील अशाच प्रकारचे डेटासेट यापूर्वी वापरल्याचे मान्य केले आहे. 'गुगल', 'मायक्रोसॉफ्ट' या कंपन्यांसमोरही एआयच्या ट्रेनिंगसाठी वापरलेल्या डेटावरून कायदेशीर आव्हाने उभी राहिली आहेत. 'ॲमेझॉन', 'गुगल', 'मायक्रोसॉफ्ट', 'एनव्हिडिया' यांसारख्या तंत्रज्ञान क्षेत्रातील बड्या कंपन्यांनीही 'अँथ्रोपिक' मध्ये गुंतवणूक केली आहे. आधुनिक एआय मॉडेलची उभारणी कशा प्रकारे होते, याची कल्पना यातून येईल. सध्याच्या कॉपीराइट कायद्यांच्या मर्यादांची चर्चाही होत आहे. एआयमुळे मानवी जीवन सोपे होत आहे आणि ज्ञानाचा नवा प्रवाह सुरू झाला आहे. मात्र, प्रशिक्षणासाठी होणारा पुस्तकांचा वापर आणि लेखकांच्या हक्कांचे संरक्षण, याबद्दल आता गंभीर प्रश्न उभे राहिले आहेत.

## टोल द्या आणि मरा...



मंगळवारी सायंकाळी पाच वाजता एक अतिज्वलनशील पदार्थ नेणारा टँकर या महामार्गावरील बोरघाटामध्ये उलटला आणि त्या वेळेस या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांची कर्मकहाणी सुरू झाली.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील अभूतपूर्व आणि जीवघेणी वाहतूक कोंडी अखेर ३४ तासांनी सुटली. राज्यातील दोन महानगरांना जोडणारा हा महामार्ग फक्त टोल वसुलीसाठीच असून, त्याच्यावरून प्रवास करणाऱ्यांची काळजी घेण्याची जबाबदारी कोणाचीही नाही, हेच या कोंडीतून पुन्हा एकदा सिद्ध झाले.

पुढचे अनेक तास आपल्याला अन्न व पाण्यावाचून काढावे लागणार आहेत, याची कल्पना यांपैकी कोणालाच नव्हती. हा द्रुतगती मार्ग असल्याने तेथे मध्ये कोठेही स्वच्छतागृह अस्तित्वातच नाही. त्यामुळे प्रवासी महिलांचे अतोनात हाल झाले. देशातील सर्वाधिक म्हणजे तब्बल ३२० रुपये टोल या १६० किमी अंतराच्या मार्गावर घेतला जातो. त्यात आता 'अटल सेतू'च्या अडीचशे रुपयांची भर पडली आहे. घाटाला पर्याय म्हणून गेली अनेक वर्षे होत असलेली 'मिसिंग लिंक' प्रत्यक्षात सुरू झाल्यास टोलमध्ये आणखी भर पडेल.

सर्वाधिक टोल देत असल्यामुळे या रस्त्यावर आपल्याला सर्वाधिक सोयी मिळतील अशा भ्रमात असण्याचे कारण नाही, याची जाणीव प्रवाशांना टोलनाक्यापासूनच होऊ लागते. जड मालवाहतूक करणारे अजस्र ट्रक या घाटामधील तिन्ही मार्गिका व्यापून वाहतुकीची कोंडी करून टाकतात. त्याच्यावर नियंत्रण करण्यासाठी पोलिस नावाची यंत्रणा कधीही उपस्थित नसते. फक्त मुख्यमंत्री किंवा अतिमहत्त्वाच्या व्यक्ती प्रवास करणार असतील, तरच पोलिस दिसतात. तेदेखील गाड्यांचा ताफा पुढे गेला की निवांतपणे निघून जातात. सामान्य प्रवाशांसाठी आपण नाही हेच त्यांना ठासून सांगायचे असते. त्याबद्दल कितीही बातम्या प्रसिद्ध झाल्या, समाजमाध्यमांवर कितीही चर्चा झाली तरीही फरक पडत नाही, इतकी ही यंत्रणा निर्ढावलेली आहे.

बुधवारच्या वाहतूक कोंडीत एखादी अतिमहत्त्वाची व्यक्ती अडकली असती, तर कदाचित यंत्रणेला वेळेवर जाग येऊन हालचाल झाली असती; पण अडकले ते सर्वसामान्य. त्यांना होत असलेल्या त्रासाची काळजी घेण्याची गरज कोणाला कशाला वाटेल? या महामार्गाच्या देखभाल दुरुस्तीचे कंत्राट 'आयआरबी' या खासगी कंपनीकडे देण्यात आले आहे. अशा प्रकारच्या दुर्घटना झाल्या, तर त्यातून मार्ग काढण्याची क्षमता त्या कंपनीकडे आहे का, याची तपासणी गेल्या अनेक वर्षांत झालेली नसणार. बुधवारच्या घटनेमध्ये अतिज्वलनशील पदार्थ दुसऱ्या टँकरमध्ये भरण्यासाठी लागणारे तज्ज्ञ शोधण्यापासून तयारी होती. मग लागणारा वेळ, प्रवाशांचे हाल याविषयी न बोललेलेच बरे.

एरवी आपल्या कर्तृत्वाचे ढोल वाजविण्यासाठी समाजमाध्यमांचा प्रभावी वापर करणारे सगळे नेते व त्यांचे बगलबच्चेही यातून गायब होते. एकाही मंत्र्याला किंवा यंत्रणेला अशी घटना झाल्याचे प्रवाशांना कळवावेसे वाटले नाही. इतकेच कशाला घाटामध्ये वाहतूक कोंडी झाल्यावर टोल नाक्यांवर वाहतूक थांबवावी, तेथून प्रवाशांना परत पाठवावे ही सुबुद्धीही सुचली नाही. पुण्याकडच्या टोलनाक्यावर काही तासांनी वाहतूक थांबविण्यात आली; पण मुंबईच्या बाजूच्या टोलनाक्यावर तर वाहतूक कोंडीतील वाहनांची रांग टोलनाक्याच्या तोंडाशी येईपर्यंत वाहने सोडणे सुरूच होते.

एखादी दुर्घटना झाली की मंत्रालयामध्ये 'वॉर रूम' स्थापून सर्व यंत्रणांमध्ये समन्वय साधून काम करण्याची एक नवी पद्धत गेल्या काही वर्षांमध्ये तयार झाली आहे. द्रुतगती मार्गावरील घटनेची दखलच कोणत्याही मंत्र्यांने, आमदाराने घेतली नाही. मुख्य सचिव, पोलिस महासंचालक यांनाही त्याचे काही वाटले नाही. त्यामुळे असे एकत्रित प्रयत्न करण्याचा प्रश्नच नव्हता. मुख्यमंत्री कार्यालयातून फक्त या दुर्घटनेची चौकशी करण्याचे व अहवाल सादर करण्याचा आदेश देण्यात आला. आता ही चौकशी कोण करणार, त्यात कोण दोषी ठरणार, त्यांच्यावर काय कारवाई होणार याची उत्तरे कोणी विचारायची नाहीत; कारण ती कधीच मिळणार नाहीत. अशी काही चौकशीही होणार नाही. मुळात सरकारला या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्यांच्या सुरक्षेची काहीही काळजी नाही.

येणारे प्रवासी टोल देतात किंवा नाही, दर दोन वर्षांनी टोल वाढविला तरीही ते मुकाट्याने टोल देतात की नाही, हे बघणे एवढीच आपली जबाबदारी आहे, असे सरकारने ठरविले आहे; मग प्रवाशांचे काहीही झाले तर त्यांचे ते बघून घेतील, असाच सरकारी खाक्या आहे. त्यामुळे यापुढे हा प्रवास करायचा असेल, तर या सगळ्या त्रासाची मानसिक तयारी करा, हाच अभूतपूर्व वाहतूक कोंडीचा संदेश आहे. प्रवाशांनो, तुम्ही फक्त टोल द्या आणि मरा; तुम्हाला कोणी वाली नाही!

## फैसला नेते करणार की न्यायालय?



विलीनीकरणाला छेद देणारी विधाने राष्ट्रवादीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल, ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केली आहेत. एकूणच दोन्ही राष्टवादींची एकत्र येण्याची शक्यता दुरावत आहे.

राजकारणाला अनेक कंगोरे असतात. जो ज्या नजरेने पाहतो त्याला ते तसे दिसते. आपापली राजकीय भूमिका आपल्या सहकाऱ्यांना व समर्थकांना पटवून देणे हे सर्वात मोठे कौशल्य मानले जाते. जो यात यशस्वी ठरतो तो अधिक काळ राजकारण करू शकतो.

महाराष्ट्र गेली काही वर्षे राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना या दोन महत्त्वपूर्ण राजकीय शक्तींच्या फाटा-फुटीमुळे ढवळून निघाला आहे. महाराष्ट्राची मातीच वेगळी आहे. एरवी दोन पक्ष वेगळे झाल्यानंतर मूळ पक्षांची शक्ती क्षीण होऊन हा विषय लौकिकार्थाने संपायला हवा होता. पण तो संपत नाही हे या राज्यातील जनमानसाच्या, त्यांच्या विचारशक्तीच्या जीवंतपणाचे लक्षण आहे. शरद पवार व उध्दव ठाकरे हे दोन मातब्बर जायबंदी होऊन त्यांचे उरलेसुरले पक्षबळ संपले की राज्याच्या राजकारणाची फेरमांडणी होईल, हा होरा चुकतो तो याच बळावर.

शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमधील फाटाफूट व खरा पक्ष कोणता याबाबत निवडणूक आयोग व विधानसभा अध्यक्षांनी दिलेल्या निकालाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालय काय निर्णय देते याची प्रतीक्षा आहे. शहरी, ग्रामीण भागात यावर चर्चा रंगताना दिसते. तो निकाल यायचा तेव्हा येईल. पण त्याआधीच संपूर्ण राज्य सध्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन गटांच्या एकत्रीकरणावर चर्चा करत आहे. राजकारातल्या मोठ्या माणसांच्या प्रतिक्रियांमुळे तो विषय मागे पडताना दिसत नाही. सार्वजनिक चर्चा पाहता राष्ट्रवादीच्या दोन गटांचे विलीनीकरण झाले तर नवल नाही, असे लोकांना वाटते. उद्या शिवसेनेचे दोन गट एकत्र येतील, असे कोणी म्हटले तर त्यावर विश्वासच ठेवला जाणार नाही.

यापूर्वी राजकीय पक्षांचे विलीनीकरण हा विषय सर्वाधिक गाजला तो ८० च्या दशकात. आपला काँग्रेस (समाजवादी) हा पक्ष शरद पवार यांनी डिसेंबर १९८६ मध्ये काँग्रेस (आय) मध्ये विलीन केला. त्यासाठी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी खास उपस्थित राहिले होते. त्यावेळी पवार यांना मराठवाड्यात मोठे जनसमर्थन लाभलेले होते. विलीनीकरणाचा कार्यक्रम छत्रपती संभाजीनगर (तेव्हाचे औरंगाबाद) येथे पार पडला. हा निर्णय न पटलेले अनेक तरुण बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाकडे आकर्षित होऊन शिवसेनेत गेले होते.

या विलीनीकरणावर प्रतिक्रिया देताना शरद पवार म्हणाले होते की, काँग्रेस संस्कृतीचे जतन करण्यासाठी आम्ही एकत्र आलो आहोत. पवार घराणे राजकारणात पक्के मुरलेले असल्याने ते कधी कोणती भूमिका घ्यावी यात माहिर आहेत. थोरल्या पवारांचा हा निर्णय राज्याच्या राजकारणात फार खळबळ माजवणारा ठरला होता. काँग्रेस (आय) विरोधात मोठी फळी पवारांनी उभी केलेली होती. तसेच ते काँग्रेस (स), भाजपा, शेका पक्ष आणि जनता पक्षाच्या पुरोगामी लोकशाही आघाडीचे नेते म्हणून विरोधी पक्ष नेतेपदावर होते.

सध्या जोरदार चर्चा सुरू आहे ती शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील वेगळा झालेल्या राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची. हे विलीनीकरण अजित पवार हयात असताना शक्य वाटत होते तेवढे आता वाटत नाही. कोणी काहीही म्हणत असले तरी जानेवारीच्या ९ तारखेच्या आसपास एनडीटीव्ही या वृत्तवाहिनीला मुलाखत देताना म्हणाले होते की, दोन्ही राष्ट्रवादीतील कार्यकर्त्यांची एकत्र येण्याची भूमिका आहे आणि कुटुंबातील ताण-तणाव आता संपले आहेत. त्याआधी एका वृत्तवाहिनीशी बोलताना ते म्हणाले होते की राजकारणात कोणीही कायमचा शत्रू नसतो.

पुढे जिल्हा परिषद निवडणुकांची तयारी सुरू झाली आणि थोरल्या पवारांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार ह्युतुतारीह्लऐवजी घड्याळ या चिन्हावर लढणार अशा बातम्या येऊ लागल्या. विलीनीकरण या विषयाला बळकटी देणारी ही फार मोठी घडामोड होती. कारण पुढे २०२९ मध्ये लोकसभा व विधानसभा निवडणूक प्रचारात समजा हेच लोक तुतारी आणि घड्याळ या दोन भिन्न चिन्हांच्या उमेदवारांचा वेगळा प्रचार आपापल्या कार्यक्षेत्रात करू लागले तर तुम्ही कोणत्या चिन्हावर जिल्हा परिषद आणि पंचायत समितीत निवडून आलात असा प्रश्न लोक करणार नाहीत? किमान पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, अहिल्यानगर या भागात तरी हा प्रश्न समोर येणे क्रमप्राप्त आहे.

अजित पवार यांनी विलीनीकरणाबाबत जी जी विधाने केली त्याला विरोध करणारी विधाने ना त्यांच्या पक्षातून आली ना महायुतीतून आली. तेव्हा मौन बाळगणे पसंत करणारे त्यांचे काही निवडक सहकारी आता तसे काही नव्हतेच असे सांगू लागले आहेत. म्हणजेच ते विलीनीकरणाच्या विरोधात आहेत. ते का आहेत तर भाजपाची साथ त्यांना सोडायची नाही. शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष विलीन झाल्यावर एनडीएत सामील होऊन सत्तेत सहभागी होणार होता, असे चित्र रंगवले जात असले तरी त्यात तथ्य दिसत नाही. कारण अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूनंतर चौथ्या दिवशी शरद पवार या विषयावर बोलले. तेव्हा पत्रकारांच्या एका प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले की विलीनीकरणाच्या चर्चेत भाजपासोबत जाणे हा मुद्दाच नव्हता. या उत्तरात सारेच आले.

विलीनीकरणाला छेद देणारी विधाने राष्ट्रवादीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल, ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केली आहेत. मंत्री हसन मुश्रीफ व माजी मंत्री धनंजय मुंडे हे ही त्यांच्याच बाजूने आहेत. एकूणच दोन्ही राष्ट्रवादींचे एकत्र येण्याची शक्यता दुरावत असली तरी या दोन्ही पक्षांच्या समर्थकांच्या व कार्यकर्त्यांच्या भावना पाहता त्यावर उलटसुलट चर्चा सुरूच राहणार व हा मुद्दा चलबिचल करणारा ठरणार असे दिसत आहे. पुढे तीन-साडेतीन वर्षे निवडणुका नाहीत. तेव्हा या विषयाचा कसा निकाल लागेल आणि तो सर्वोच्च न्यायालयातील निकालावरच अवलंबून असेल का, हा ही एक मुद्दा जिवंत राहतो.

जे राष्ट्रवादीबाबत घडू शकते ते शिवसेनेबाबत घडण्याची शक्यताही कोणी बोलून दाखवत नाही, हा राजकारणाचा दुसरा पैलू आहे. राष्ट्रवादीची फूट आणि शिवसेनेची फूट यात काय फरक आहे हे यातून दिसून येते. जेव्हा जेव्हा शिवसेना फुटली तेव्हा तेव्हा तो विषय निव्वळ राजकीय न राहता भावनिक अर्थाने घेतला गेला. त्यामुळे मुळ प्रवाहापासून अलग झालेल्यांची संभावना शेलक्या विशेषणांनी करण्यात आलेली आहे. सर्वोच्च न्यायालयात शिवसेना व राष्ट्रवादी या दोन्ही पक्षांबाबतचे निकाल कधीना कधी येतीलच. पण त्यानंतर कोण नेहमीसाठी भाजपासोबत जातो आणि कोण मूळ पक्षात राहतो यानुसार पक्षनिष्ठा आणि राज्याचे राजकारण यांची फेरमांडणी होईल.

२०२२ आणि २३ साली अनुक्रमे शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षातील दोन मोठे गट बाहेर पडले आणि कालांतराने त्यांनाच मूळ पक्ष म्हणून मान्यता मिळाली. पण त्याला जनमान्यता नव्हती हे २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत दिसून आले. महाराष्ट्राचा मतदार नेहमी सत्तापक्षासोबतच राहील याची खात्री नाही हे दाखवणारे हे निकाल होते. त्याच वर्षी सहा महिन्यांनंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत लोकसभेच्या उलट निकाल आले. पण त्याबाबत शंका व्यक्त झाल्या. एकूण काय तर महाराष्ट्राचे राजकारण एकतर्फी चालणार नाही.

## हिंदूंचे पुनर्वसन कोण करणार ?



आसाम, मिझोराम, मणीपूर या राज्यांतील 'कुकी' आणि 'मिझो' अशी ओळख असलेल्या आदिवासी समाजातील नागरिक मोठ्या प्रमाणात इस्रायलमध्ये स्थलांतरित होत आहेत. आतापर्यंत या समाजातील साधारण ४ सहस्र आदिवासी समाजातील नागरिकांनी इस्रायलमध्ये स्थलांतर केले आहे. याचे कारण, म्हणजे या आदिवासी समाजाचे मूळ इस्रायलमध्ये आहे. अनेक वर्षांपूर्वी इस्रायलवरील आक्रमणाच्या वेळी ज्यू जगातील विविध देशांमध्ये विभागले गेले. आसाम, मणीपूर आणि मिझोराम येथील 'कुकी' किंवा 'मिझो' हा आदिवासी समाज त्यांमधीलच एक आहे. इस्रायल अशा विस्थापितांना 'बनेई मेनाशे', म्हणजेच 'ज्यू प्रेषितची मुले' म्हणून ओळखतो. जगभरातील अशा 'बनेई मेनाशे' यांना, म्हणजेच मूळचे 'ज्यू' असलेल्या नागरिकांना पुन्हा मायदेशात आणण्यासाठी इस्रायलची धडपड चालू आहे. वर्ष २०३० पर्यंत भारतातील अशा सर्व 'बनेई मेनाशे'ना स्वदेशात आणण्याचे ध्येय इस्रायलने ठेवले आहे. स्वधर्मीय बांधवांना पुन्हा मातृभूमीत आणण्यासाठी इस्रायलचे हे प्रयत्न निश्चितच वाखाणण्यासारखे आहेत. भारताने यातून निश्चितच बोध घ्यायला हवा.

आसाम, मिझोराम, मणीपूर राज्यांतील 'कुकी' आणि 'मिझो' आदिवासी समाजाला ख्रिस्ती मिशर्नयांनी लक्ष्य केले. मागील अनेक वर्षांपासून त्यांचे धर्मांतर करण्याचा प्रयत्न ख्रिस्ती मिशनरींनी केला. त्यामुळे सद्यःस्थितीत या मूळ ज्यू नागरिकांपैकी अनेकांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला आहे; परंतु तरीही त्यांना पुन्हा मायदेशी आणण्यासाठी इस्रायलने कंबर कसली आहे. एरव्ही जगभरातील विखुरलेले ज्यू नागरिक जेव्हा इस्रायलमध्ये येतात, तेव्हा त्यांना 'आलिया' या नावाने ओळखले जाते; परंतु भारतातील या नागरिकांपैकी अनेकांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला असल्यामुळे इस्रायलमध्ये प्रवेश देण्यापूर्वी धार्मिक विधी करून त्यांना प्रथम ज्यू केले जाणार आहे. या नागरिकांना इस्रायलमध्ये घेतांना त्यांना त्यांची 'हिब्रू' भाषा शिकवण्यापासून त्यांचे पुनर्वसन करण्यापर्यंतचे दायित्व इस्रायलने घेतले आहे. त्यासाठी इस्रायल सरकारने अर्थसंकल्पामध्ये २८ कोटी डॉलर, म्हणजेच भारतीय चलनानुसार साधारण २५४ कोटी रुपयांचे प्रावधान केले आहे. इस्रायलमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्यांनुसार या समाजाचे इस्रायलमधील 'गॅलिली' भागात, म्हणजेच जिकडे पॅलेस्टिनी आणि अरब समाज अधिक रहातो आणि एकूणच तुरळक वस्ती असलेल्या भागात त्यांना ठेवले जाणार आहे. लेबेनॉनच्या सीमारेषेजवळचा हा प्रदेश आहे. इस्रायलचा अरबी देशांशी सतत संघर्ष चालू असलेला हा प्रदेश आहे, म्हणजेच स्वतःच्या देशाला संरक्षण पुरवणे आणि स्वतःची शक्ती वाढवणे, हा 'बनेई मेनाशे' यांच्या इस्रायलमधील स्थलांतरामागील मुख्य उद्देश असू शकतो. यामध्येही काही वावगे वाटण्याचे कारण नाही.

या प्रक्रियेची विशेषता, म्हणजे आसाम, मिझोराम, मणीपूर या राज्यांतील 'कुकी' आणि 'मिझो' या आदिवासी समाजाचे मूळ ज्यू असले, तरी अनेक वर्षे भारतात रहात असल्यामुळे त्यांचे नागरिकत्व भारतीयच आहे, म्हणजेच एकप्रकारे भारतीय नागरिकांचेच इस्रायलमध्ये पुनर्वसन होत आहे. असे असूनही भारताने याला विरोध दर्शवलेला नाही. उलट 'इस्रायल आणि भारत यांच्यातील समरसतेचे उदाहरण', अशी भूमिका केंद्र सरकारने घेतली आहे. अर्थात ही काही चुकीची भूमिका आहे, असे नाही. इस्रायल आपले मित्र राष्ट्र आहे. त्यामुळे मूळ स्वतःचे पूर्वज असलेल्या देशात हा समाज जात असेल, तर त्यामध्ये काहीही वावगे असण्याचे कारण नाही आणि ज्याला जिथे जायचे आहे अथवा रहायचे आहे, हे स्वातंत्र्य ज्याचे त्याचे आहे. त्याला आक्षेप घेता येत नाही. इस्रायल हे जगभरातील ज्यू नागरिकांचे आश्रयस्थान आहे. यापूर्वीही सीरियात छळाला सामोरे जाणाऱ्या ज्यू नागरिकांना इस्रायलने स्वतःच्या भूमीत आश्रय दिला आहे. प्रसंगी गुप्तहेर यंत्रणांचे साहाय्य घेऊनही इस्रायलने सीरियातील ज्यू नागरिकांना मायदेशी आणले. त्यासाठी 'ऑपरेशन ब्लँकेट'सारख्या धडाडीच्या मोहिमा इस्रायलने राबवल्या आहेत. हीच गोष्ट इतर देशातील ज्यू नागरिकांना परत आणण्याची! वेगवेगळ्या देशांत असलेल्या, वेगळ्या संस्कृतीमध्ये वाढलेल्या, वेगळी शिक्षणपद्धत आणि वेगळी भाषा बोलणाऱ्या ज्यू नागरिकांना स्वतःच्या धर्मभूमीत आणण्याचे इस्रायलचे कर्तृत्व निश्चितच वाखाणण्यासारखे आहे. धर्मबांधव म्हणून कसे एकत्र यायला हवे, हे खरेतर हिंदूंनी यातून शिकण्यासारखे आहे. जगभरातील ज्यू नागरिकांना अगदी आदिवासी जमातीमधील असूनही 'धर्मबांधव' म्हणून स्वतःच्या देशात सामावून घेण्याची इस्रायलची ही धडपड निश्चितच वाखाणण्याजोगी आहे.

ज्यू नागरिकांच्या पुनर्वसनासाठी केलेले सहकार्य हा भारताचा चांगुलपणा होय. मित्रराष्ट्रासाठी असे करणे स्वाभाविक आहे; परंतु या सर्व प्रक्रियेत भारताने चिंतन करावे अशा काही गोष्टी निश्चितच अधोरेखित कराव्या लागतील. 'कुकी' आणि 'मिझो' या नावाने ओळखले जाणारे हे नागरिक भारतात अनेक वर्षे रहात असूनही त्यांना पुन्हा स्वतःच्या मातृभूमीत आणण्यासाठी जी धडपड इस्रायलने केली, तशी धडपड कधी भारताने केली आहे का? हा प्रश्न निश्चितच चिंताजनक आहे. सद्यःस्थितीत बांगलादेश, अफगाणिस्तान आणि पाकिस्तान या देशांत लाखो हिंदू नरकयातना भोगत असूनही त्यांना भारतात आणणे सोडून द्या, त्यांना भयमुक्त करण्याचे कार्यही भारत करू शकलेला नाही, हे देशाचे आणि प्राधान्याने येथे सर्वाधिक काळ सत्तेमध्ये असलेल्या काँग्रेसचे अपयश आहे. देशात सत्ता पालट झाल्यानंतरही या परिस्थितीत विशेष पालट झालेला नाही. अद्यापही पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तान येथे हिंदूंवर अत्याचार चालूच आहेत. एकीकडे अन्य देशात असलेले स्वतःचे वंशज धर्मांतरित झाल्यावरही त्यांना पुन्हा स्वभूमीत आणण्यासाठी इस्रायल धडपडत आहे, तर दुसरीकडे भारताच्या शेजारील देशांमध्ये हिंदूंवर मोठ्या प्रमाणात अत्याचार अन् त्यांच्या हत्या होत असतांना सरकार मात्र गप्प आहे. यासह भारतातील हिंदूंचे मोठ्या प्रमाणात धर्मांतर होत असूनही ते रोखण्यासही सर्वपक्षीय शासनकर्ते अपयशी ठरले आहेत. भारतातील सर्वधर्मसमभावाचा परिणाम किती भयावह आहे, याचाच हा प्रत्यय आहे. आम्हाला स्वतःच्या देशातील हिंदूंची किंमत नाही, तर विदेशातील हिंदूंचे आम्ही काय करावे? हे सूत्र शासनाला दोष देण्याचे नाही; पण एक 'हिंदु समाज' म्हणून एकीकरणाची उत्कट भावना आपल्यामध्ये नाही, ही मात्र वस्तूस्थिती आहे. यासाठी भारतात स्थलांतरित व्हायला हवे, असे नाही; परंतु धर्म म्हणून जगभरातील हिंदू एकत्र होऊ शकत नाहीत का ? हा प्रश्न आहे. त्यामुळे यापुढेही आपण सर्वधर्मसमभावाच्या बुडत्या काठीला पकडून राहिलो, तर काही वर्षांनी जगात राहू द्या; पण भारतातूनही हिंदु नामशेष व्हायला वेळ लागणार नाही!

## १०-१२ वी विद्यार्थ्यांसाठी ठाणे वाहतूक पोलिसांचे ५४ 'रायडर्स' सज्ज
# परीक्षा केंद्रांवर वेळेत पोहोचवण्यासाठी विशेष मदत उपक्रम

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

दहावी व बारावी बोर्ड परीक्षांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना वेळेत परीक्षा केंद्रावर पोहोचता यावे, यासाठी ठाणे शहर वाहतूक पोलिसांनी विशेष मदत उपक्रम सुरू केला आहे. रस्त्यातील अडचणींमुळे विद्यार्थ्यांची परीक्षा चुकू नये, यासाठी तब्बल ५४ 'रायडर्स' तैनात करण्यात आले असून हेल्पलाइन क्रमांकही जाहीर करण्यात आले आहेत.




दहावी व बारावी बोर्ड परीक्षांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना वेळेत परीक्षा केंद्रावर पोहोचता यावे, यासाठी ठाणे शहर वाहतूक पोलिसांनी विशेष मदत उपक्रम सुरू केला आहे. रस्त्यातील अडचणींमुळे विद्यार्थ्यांची परीक्षा चुकू नये, यासाठी तब्बल ५४ 'रायडर्स' तैनात करण्यात आले असून हेल्पलाइन क्रमांकही जाहीर करण्यात आले आहेत.

पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे आणि सहआयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक विभागाने ही सुविधा सुरू केली आहे. परीक्षेच्या दिवशी उशीर होणे, वाहन बिघाड, अचानक वाहतूककोंडी किंवा इतर आपत्कालीन अडचणी निर्माण झाल्यास विद्यार्थ्यांना तातडीने मदत मिळावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. शहरातील महत्त्वाच्या मार्गावर ५४ रायडर्स तैनात करण्यात आले आहेत. याशिवाय १८ वाहतूक युनिट्समार्फत संपकार्ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून ट्राफिक कंट्रोलसाठी स्वतंत्र व्हॉट्सॲप आणि हेल्पलाइन क्रमांकही कार्यरत ठेवण्यात आले आहेत. नियंत्रण कक्षातही ३ वाहने सज्ज ठेवण्यात आली आहेत.

### विशेष यंत्रणा कार्यरत

महाराष्ट्र राज्य माध्यमिक (इयत्ता १० वी) परीक्षा १० फेब्रुवारीपासून, तर उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरू होत आहेत. ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत इयत्ता १२ वीसाठी १२६ परीक्षा केंद्रे आणि इयत्ता १० वी साठी २२३ परीक्षा केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. या सर्व केंद्रांकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना रस्त्यात अडचण आल्यास तातडीने मदत मिळावी, यासाठी ही विशेष यंत्रणा कार्यरत राहणार आहे.

### वाहतूक पोलिसांचे हेल्पलाइन क्रमांक


विद्यार्थी किंवा पालकांनी अडचण निर्माण झाल्यास वाहतूक विभागाच्या ट्राफिक कंट्रोल हेल्पलाइन क्रमांक ८२८६३००३००, ८२८६४००४०० तसेच व्हॉट्सॲप क्रमांक ७०३९००३८६६ वर संपर्क साधावा, असे आवाहन वाहतूक उपायुक्त पंकज शिरसाट यांनी केले आहे.

## पाणीपुरी खाल्ल्याने १६ जण रुग्णालयात

**■जालना। प्रतिनिधी,**

जालन्यातून धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पाणीपुरी खाल्ल्यानंतर तब्बल १५ ते १६ जणांना उलट्या-जुलाबाचा त्रास झाल्याने शहरात खळबळ उडाली आहे. यात लहान मुलांचाही समावेश असून सगळ्यांवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. ही घटना जालन्यातील जुना जालना भागातील टट्टूपुरा परिसरात ही घटना घडली आहे. जालन्यात फूड पॉइझनिंगची धक्कादायक घटना समोर आली आहे. पाणीपुरी खाल्ल्यानंतर तब्बल 15 ते 16 जणांना उलट्या-जुलाबाचा त्रास झाल्याने शहरात खळबळ उडाली आहे. या घटनेत लहान मुलांचाही समावेश असून सर्वांवर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जालन्यातील जुना जालना भागातील टट्टूपुरा परिसरात ही घटना घडली आहे. टट्टूपुरा भागात एका फेरीवाल्याने पाणीपुरी विक्रीसाठी गाडा लावला होता. परिसरातील लहान मुलांसह काही नागरिकांनी या गाड्यावर पाणीपुरी खाल्ली. पाणीपुरी खाल्ल्यानंतर काही वेळातच नागरिकांना उलट्या-जुलाबाचा त्रास सुरू झाला. त्यामुळे अनेकांना अशक्तपणा जाणवू लागला. त्रास वाढत गेल्याने रात्री उशिरा बाधित नागरिकांना शहरातील विविध रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. प्राथमिक तपासणीत पाणीपुरी खाल्ल्यामुळेच फूड पॉइझनिंग झाल्याचे समोर आले आहे. या घटनेनंतर नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला जात असून महापालिका प्रशासन आणि अन्न सुरक्षा विभागाच्या कार्यक्षमतेवर सुद्धा प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

## डोंगरी, मांडवी,मोहम्मद अली रोड परिसरात महापालिकेच्या या अधिकाऱ्याची घुसून कारवाई...
# महापालिकेच्या नवख्या सहाय्यक आयुक्ताने मुंबईकरांची तोंडे केली गप



**मागील पाच ते सहा दिवसातील कारवाई**

ठिकाण: इब्राहिम मोहम्मद अली रोड(नारायण धुरू स्ट्रीट मांडवी) सरदार वल्लभ भाई पटेल रोड() इब्राहिम मोहम्मद मर्चंड रोड, मांडवी संत तुकाराम रोड, युसूफ मेहरली रोड, लोकमान्य टिळक रस्ता

**कारवाई :** स्टॉल्स :२५ वाढीव बांधकामे :४० बोलार्ड ग्रील : १० बेकायदेशीर फेरीवाले: ३५

**■मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबई महापालिका आयुक्तांच्या निर्देशानुसार मुंबईतील काही विभागांमध्ये महापालिकेच्या वतीने अनधिकृत फेरीवाले आणि पदपथांवर करण्यात आलेल्या वाढीव बांधकामांवर कारवाई होत आहे. मात्र ही कारवाई होत असतानाच संपूर्ण मुंबईचे लक्ष ज्या कारवाईने वेधून घेतले आहे,ते आहे डोंगरी, मोहम्मद अली रोड येथील कारवाईने. या भागातील फेरीवाले आणि त्यांच्या अतिक्रमणावर कारवाई करण्याची हिंमत होत नव्हती. पण नवख्या सहाय्यक आयुक्त असलेल्या योगेश देसाई यांनी मुस्लिम बहुल विभागात ही धडक कारवाई करत महापालिका आयुक्त आणि अतिरिक्त आयुक्त (शहर) यांचा विश्वास सार्थ ठरवला आहे. महापालिकेच्या या कारवाईमुळे डोंगरी, पायधुनीत जाऊन कारवाई करून दाखवा असे आव्हान देण्याची हिंमत जनतेची होणार नाही.

महापालिकेच्या बी विभागाच्या वतीने सलग चार दिवस कारवाई सुरू असून या कारवाईमध्ये फेरीवाल्यांसह त्यांची वाढीव बांधकामे ही जमीनदोस्त करण्यात आलेली आहे. महापालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्त आणि उपायुक्त यांचं पाठबळ असल्यास सहाय्यक आयुक्त काय करू शकतो हे नवख्या असलेल्या बी विभागाचे सहाय्यक आयुक्त योगेश देसाई यांनी करून दाखवले आहे. योगेश देसाई यांच्यासारख्या नवख्या सहाय्यक आयुक्तांना बी विभागाची दिल्याने प्रशासनावर तीव्र टीका झाली होती. या विभागात अनुभवी किंवा विभागाच्या कार्यकारी अभियंता यांची प्रभारी नियुक्ती करून जबाबदारी सोपवण्यात यावी असे म्हटले जात होते. पण नवख्या असलेल्या योगेश देसाई यांनी सहाय्यक आयुक्त पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर अत्यंत संवेदनशील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या बी विभागातील अनधिकृत बांधकामांची बजबजपुरी माजलेल्या या भागात ही कारवाई करून आपण एक सक्षम सहाय्यक आयुक्त आहोत हे दाखवून दिले आहे.

योगेश देसाई यांच्या चमूने २९ जानेवारीपासून हाती घेतलेल्या या कारवाईत ५ फेब्रुवारी पर्यंत सरदार वल्लभ भाई पटेल रोड. इब्राहिम मोहम्मद अली रोड,युसूफ मेहरली रोड,लोकमान्य टिळक रस्ता आधी ठिकाणी कारवाई करत २५ अनधिकृत स्टॉल, ४० वाढीव बांधकामे,१० बोलार्ड ग्रील तसेच ३५ फेरीवाल्यांवर कारवाई करतानाचा या भागात सखोल स्वच्छता मोहीम राबवून रस्ते आणि पदपथ साफ केले. या विभागात यापूर्वी महापालिकेचे तत्कालीन सहायक आयुक्त उदयकुमार शिरूरकर यांनी अशाप्रकारे धडक कारवाईचा धडाका लावला होता. शिरूरकर हे महापालिकेचे अधिकारी होते आणि परीक्षा देत सहाय्यक आयुक्त बनले होते. त्यामुळे त्यांना महापालिकेच्या कामकाजाचा आणि कार्यपद्धती तसेच भौगोलिक परिस्थितीची कल्पना होती. पण योगेश देसाई यांच्यासारख्या नवख्या अधिकाऱ्याने या संवेदनशील विभागात सातत्यपूर्ण कारवाई करून आपण काही कमी नसल्याचे दाखवून दिले आहे.

कुल्यार्तील घटनेनंतर मुंबईत फेरीवाले आणि त्यांच्या वाढीव बांधकामांवरोधात सुरू झालेल्या या कारवाईत बी विभागातील ही कारवाई जनतेचा महापालिकेवरील विश्वास वाढवताना दिसत आहे.

## वसई-विरारमध्ये ३० दिवसांत १४४ होर्डिंग्जवर कारवाई

**कायदा काय म्हणतो?**

उच्च न्यायालयाच्या निदेर्शानुसार, महापालिका हद्दीतील सार्वजनिक ठिकाणी विनापरवाना कोणतेही फलक, बॅनर किंवा पोस्टर लावण्यास मनाई आहे. महापालिकेच्या पूर्वपरवानगीशिवाय सार्वजनिक रस्ते व पदपथांवर जाहिरात फलक लावल्यास संबंधितांविरोधात महाराष्ट्र मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंधक कायदा १९९५ तसेच मुंबई महापालिका अधिनियम १८८८ मधील कलम ३२८/ ३२८-अ आणि ४७१ अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात येते.




**■विरार। प्रतिनिधी,**

वसई-विरार शहर महानगर पालिकेच्या जाहिरात विभागाच्या माध्यमातून शहरातील आणि शहरांच्या बाहेरील होल्डिंग्सवर मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली आहे. ३० दिवसांत तब्बल १४४ होल्डिंग जमीनदोस्त करण्यात पालिकेच्या जाहिरात विभागला यश आले असून ४६ होल्डिंग मालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

वसई विरार शहर आणि शहराच्या सार्वजनिक ठिकाणी विनापरवाना बॅनर्स, फलक आणि पोस्टर्स लावर्णायांविरोधात वसई- विरार महापालिकेने कठोर कारवाई सुरू केली आहे. महापालिका हद्दीत तात्पुरत्या जाहिरातींसाठी अधिकृत जागा उपलब्ध करून देण्यात आलेल्या असतानाही काही संस्था, संघटना आणि व्यावसायिकांकडून रस्त्यांच्या दुतर्फा असलेल्या विजेच्या खांबांवर अनधिकृत फलक लावण्यात येत असल्याचे निदर्शनास आले होते.

त्यानुसार पालिकेच्या जाहिरात विभागाकडून १ जानेवारी ते ३० जानेवारीपर्यंत कारवाई करण्यात आली. या ३० दिवसांत एकूण १४४ अनधिकृत होल्डिंग्स निष्कासित करण्यात आले. यामध्ये अंदाजे दहा लाखांचा मुद्देमाल पालिकेकडून जप्त करण्यात आला आहे. पालिकेने केलेली कारवाई ही सर्वात मोठी कारवाई असल्याचे बोलले जात आहे. अशाच पद्धतीने पुढे देखील कारवाई सुरू राहील अशी माहिती जाहिरात विभागाचे दशरथ वाघेला यांनी दिली आहे.

## विदेशी पर्यटकांची महाराष्ट्राला सर्वाधिक पसंती
# वर्षभरात तब्बल ३७ लाखांहून अधिक फॉरेनर्सची भेट

**■भिवंडी। प्रतिनिधी,**

जगभरातून भारतात येणाऱ्या विदेशी पर्यटकांसाठी महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक पसंतीचे राज्य ठरले आहे. गेल्या तीन वर्षांत राज्यात येणाऱ्या परदेशी पर्यटकांच्या संख्येत दुपटीहून अधिक वाढ झाली आहे. सन २०२२ मध्ये महाराष्ट्रात १५ लाख परदेशी पर्यटकांनी भेट दिली होती, हा आकडा नंतर चांगलाच वाढला व २०२४ मध्ये तो ३७ लाखांहून अधिक झाला असल्याची माहिती केंद्रीय पर्यटन आणि सांस्कृतिक मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी राज्यसभेत एका लेखी प्रश्नाला उत्तर देताना दिली. महाराष्ट्राची राजधानी मुंबई हे जागतिक आर्थिक केंद्र मानले जाते, तर देशाची आर्थिक राजधानी म्हणूनही मुंबईचा जगभरात लौकिक आहे. मुंबई पाहण्यासाठी, येथील पर्यटनासाठी जगभरातून पर्यटक येता असतात. मुंबईचे मार्केट असो किंवा, मुंबईचे प्रवेशद्वार असलेले ह्यगेट वे ऑफ इंडियाह्न असो. येथे पर्यटकांची मोठी गर्दी असते. यासह, निसर्गरम्य कोकण, जगप्रसिद्ध अजंठा, वेरुळच्या लेण्या आणि ऐतिहासिक वारसा असलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे गड - किल्ले हे पर्यटकांची पसंती असते. म्हणूनच, येथे पर्यटकांची मोठी गर्दी दिसून येते.



**पर्यटन मंत्रालयाकडून विविध उपक्रम**

जागतिक स्तरावर भारताला एक प्रमुख पर्यटन स्थळ म्हणून प्रस्थापित करण्यासाठी पर्यटन मंत्रालयाकडून विविध उपक्रम राबवले जात आहेत. त्यामध्ये आंतरराष्ट्रीय पर्यटन प्रदर्शने, परदेशी टूर ऑपरेटर्स आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्ससाठी आयोजित केल्या जाणाऱ्या सहली, रोड शो आणि भारतीय खाद्य महोत्सवांचा समावेश आहे. हे सर्व प्रयत्न विविध राज्य सरकारे आणि भारतीय दूतावासांच्या मदतीने केले जात असल्याचे मंत्रालयाने स्पष्ट केले.

**पर्यटन स्थळांच्या विकासासाठी आर्थिक मदत**

केंद्र सरकारकडून पर्यटन स्थळांच्या विकासासाठी 'स्वदेश दर्शन २.०' आणि 'प्रसाद' सारख्या योजनांतर्गत आर्थिक मदत दिली जाते. त्यामध्ये प्रामुख्याने पायाभूत सुविधांचा विकास आणि आध्यात्मिक वारसा स्थळांच्या संवर्धनावर भर दिला जातो. महाराष्ट्रातील पर्यटन विकासासंदर्भात केंद्र आणि राज्य सरकारमध्ये नियमितपणे चर्चा आणि समन्वय बैठका घेतल्या जातात, ज्यामुळे पर्यटनाला अधिक चालना मिळत आहे.

**देशात पर्यटन क्षेत्रात महाराष्ट्राचा वाटा सर्वाधिक**

मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रातील परदेशी पर्यटकांचा ओघ सातत्याने वाढत आहे. २०२२ मध्ये १५.२ लक्ष असलेला हा आकडा २०२३ मध्ये थेट ३३.८ लाखांवर गेला आणि २०२४ मध्ये तो ३७ लाखांवर पोहोचला आहे. विशेष म्हणजे, २०२४ मध्ये भारतात आलेल्या एकूण परदेशी पर्यटकांपैकी १७.६९ टक्के पर्यटकांनी महाराष्ट्राला पसंती दिली असून, पर्यटनाच्या बाबतीत देशात महाराष्ट्राचा वाटा सर्वाधिक राहिला आहे.


## समृद्धी महामार्गाने प्रवास करताय? १० दिवस वाहतूक निर्बंध... कोणता रस्ता कधी बंद

**■वसई। प्रतिनिधी,**

मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर पुढील काही दिवस वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागणार आहे. महामार्गावर हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम अंतर्गत वाहतूक सिग्नल, कॅमेरे, किंवा टोल यंत्रणेसाठी रस्त्यावर लोखंडी चौकट अर्थात गॅन्ट्री बसवण्याचे काम सुरु केले जाणार आहे. या कामासाठी ९ ते १८ फेब्रुवारीदरम्यान टप्प्याटप्प्याने वाहतूक थांबवली जाणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने दिली आहे.

**बुलढाणा-जालना भागात एक तास वाहतूक बंद**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ नुसार, बुलढाणा आणि जालना जिल्ह्यांच्या हद्दीत समृद्धी महामार्गावर हे काम एकूण ९ टप्प्यांत करण्यात येणार आहे. प्रत्येक टप्प्यात मुंबईकडे आणि नागपूरकडे जाणारी



वाहतूक सुमारे एका तासासाठी थांबवली जाईल.

**कोणत्या ठिकाणांवर बसवणार गॅन्ट्री?**

नागपूरकडून सुमारे ३०० ते ३६५ किलोमीटर दरम्यान गॅन्ट्री उभारण्यात येणार आहेत. त्यामध्ये लोणार, सिंदखेडराजा, देऊळगाव राजा (बुलढाणा), जालना तालुका या ठिकाणांचा समावेश आहे. येथील काम पूर्ण होताच संबंधित दिशेची वाहतूक पुन्हा सुरू करण्यात येईल.

**कोणत्या वेळेत वाहतूक बंद?**

माहितीनुसार, ९ ते १८ फेब्रुवारीदरम्यान, काही दिवस मुंबईकडे जाणारी वाहतूक दुपारी १२ ते १ वाजेपर्यंत बंद राहील. तर काही दिवस नागपूरकडे जाणारी वाहतूक दुपारी ३ ते ४ वाजेपर्यंत थांबवली जाईल. काही टप्प्यांमध्ये दोन्ही बाजूंनी वाहतूक तात्पुरती बंद ठेवली जाऊ शकते.

**वाहनचालकांसाठी सूचना**

- एमएसआरडीसीने वाहनचालकांना पुढील सूचना दिल्या आहेत-
- प्रवासाचा प्लॅन आधीच करा
- ब्लॉकच्या वेळेत संबंधित भागात जाणे टाळा
- उशीर होण्याची शक्यता लक्षात घेऊनच प्रवास करा

विशेषतः बुलढाणा आणि जालना परिसरातून जाणाऱ्या लांब पल्ल्याच्या प्रवाशांनी या वाहतूक बंदची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

**मनसेचा थेट सवाल**

ठाण्यासारख्या प्रगत जिल्ह्यात जर जिल्हा परिषद शाळांची ही अवस्था असेल, तर राज्यातील दुर्गम भागातील शाळांची परिस्थिती काय असेल? मूलभूत सुविधांशिवाय शिक्षण दिले जात असेल, तर विकासाच्या घोषणा केवळ कागदावरच राहतात, असा सवाल मनसे नेते अविनाश जाधव यांनी उपस्थित केला. या पार्श्वभूमीवर संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष घालून शाळेला वीजपुरवठा सुरु करणे व आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे.

# वीज नसलेल्या शाळेत 'डिजिटल शिक्षणा'चा गाजावाजा
## शहापूर तालुक्यातील खरम्याचा पाडा येथील झेडपी शाळेची वर्षभर उपेक्षा

**■ठाणे। प्रतिनिधी,**

'डिजिटल शिक्षण' आणि ह्यस्मार्ट शाळाह्नच्या घोषणा जोरात सुरू असतानाच शहापूर तालुक्यातील खरम्याचा पाडा येथील जिल्हा परिषद शाळेतील वास्तव प्रशासनाच्या उदासीनतेचे विदारक चित्र समोर आले आहे. केवळ १,५०० रुपयांचे वीजबिल थकले असल्यामुळे या शाळेचा वीजपुरवठा मागील तब्बल एक वर्षापासून खंडित असून, विद्यार्थ्यांचे शिक्षण अक्षरशः अंधारात सुरू आहे. या प्रकारावर मनसेने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

शाळेच्या दयनीय अवस्थेबाबत तक्रारी मिळाल्यानंतर मनसे नेते अविनाश जाधव यांनी शाळेला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली.




या पाहणीत शाळेतील मूलभूत सुविधांचा गंभीर अभाव उघडकीस आला. शाळेत सध्या ३९ विद्यार्थी शिक्षण घेत असून केवळ दोन वर्गखोल्यांमध्ये सर्व इयत्तांचे अध्यापन केले जात आहे. एका वर्गात तिसरी ते पाचवीचे विद्यार्थी एकत्र बसतात, तर दुसऱ्या वर्गात इतर इयत्तांचे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

वीजपुरवठा नसल्यामुळे शाळेत उपलब्ध असलेले स्मार्ट टीव्ही व डिजिटल शिक्षण साहित्य पूर्णपणे निष्क्रिय झाले आहे. याशिवाय विद्यार्थ्यांना बसण्यासाठी पुरेशा बाकांची कमतरता, अनेक विद्यार्थ्यांकडे गणवेश व दप्तरांचा अभाव, तसेच इतर आवश्यक शैक्षणिक सुविधांचा तुटवडा असल्याचे चित्र पाहणीत दिसून आले. या परिस्थितीचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर थेट परिणाम होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या संपूर्ण पाहणीचा व्हिडीओ अविनाश जाधव यांनी समाजमाध्यमांवर प्रसिद्ध केला असून तो मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. त्यामुळे शिक्षण विभाग आणि जिल्हा परिषद प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

**सायबर भामट्याने असे लंपास केले ९८ हजार**

सायबर भामट्याने अभिनेत्रीला सांगितले की, त्या एअर इंडियाने वारंवार देशांतर्गत विमान प्रवास करत असल्याने त्यांच्या खात्यात काही एअर इंडिया पॉईंट्स जमा झाले आहेत, जे सध्या ह्यमिसिंगह्न दिसत आहेत. हे पॉईंट्स परत मिळवण्यासाठी त्याने अभिनेत्रीला मोबाईलमध्ये एअर इंडियाचे एक विशेष ॲप डाऊनलोड करण्याचा सल्ला दिला. तक्रारीत म्हटल्यानुसार, अभिनेत्री त्या अज्ञात व्यक्तीच्या बोलण्यावर विश्वास ठेवून भूलल्या आणि त्यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करत ॲप डाऊनलोड केले. त्यांनी ॲपवर क्लिक करताच, त्यांच्या येस बँकेच्या खात्यातून पैसे कपात झाल्याचे मेसेज येऊ लागले. पाहता पाहता त्यांच्या खात्यातून ९८,००० रुपये काढले गेले. अभिनेत्रीने सांगितले की, यादरम्यान त्यांनी कोणाशीही आपला ओटीपी शेअर केला नाही किंवा कोणताही व्यवहार स्वतः केला नाही. पैसे कपात होताच त्यांचा मोबाईल फोन हँग झाला आणि त्या तो बंद पडला, त्याचा वापर त्या करु शकल्या नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच अभिनेत्रीने तत्काळ सायबर हेल्पलाइन क्रमांक १९३० वर संपर्क साधला. गुरुवारी त्यांनी गोरेगाव पोलिसांत एफआयआर दाखल केला असून त्यांच्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कॅश पॉईंट्सच्या आमिषाने ज्येष्ठ अभिनेत्रीने गमावेल हजारो रुपये... एअर इंडियाच्या नावाने सायबर फसवणूक

**■मुंबई । प्रतिनिधी,**

गोरेगावमध्ये राहणाऱ्या एका ज्येष्ठ बॉलिवूड अभिनेत्री सायबर भामट्यांच्या जाळ्यात अडकल्या आहेत. भामट्यांनी एअर इंडियाचे कर्मचारी असल्याचे सांगून त्यांना फोन केला आणि लॉयल्टी पॉईंट्स परत मिळवून देण्याचे आमिष दाखवून त्यांच्या बँक खात्यातून सुमारे ९८ हजार रुपये लंपास केले.

अभिनेत्री शशी विजय उपाध्याय-शर्मा (६५) यांनी गोरेगाव पोलिसांत दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, त्या एक ज्येष्ठ कलाकार म्हणून काम करतात आणि या उत्पन्नावरच त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. काही दिवसांपूर्वी दुपारी ४ वाजताच्या सुमारास त्यांच्या मोबाईलवर एका अज्ञात क्रमांकावरून फोन आला. फोन करणाऱ्या व्यक्तीने आपण एअर इंडियाच्या कार्यालयातील कर्मचारी असल्याचे सांगितले.




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com